सेवा पूर्व परीक्षा - 2020, दिनांक 26 एप्रिल, 2020 ... करणेबाबत...

Form -

# जिल्हाधिकारी कार्यालय ,अहमदनगर

## (महसूल शाखा)


फोन नं. 0241 2346028

E-mail → tahsildarrevahmednagar@gmail.com


महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा/अत्यंत महत्वाचे:कालमर्यादा

क्र.मह/.कार्या./आस्था-5ड/264/2020
अहमदनगर दि. 27/03/2020

प्रति,

सर्व शाखा प्रमुख व
सर्व नियुक्त अधिकारी/कर्मचारी.

विषय - महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अहमदनगर जिल्हा केंद्रावर होणारी राज्य सेवा(पूर्व) परीक्षा-2020, दिनांक 26.04.2020 बाबत.

संदर्भ - 1) मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडील पत्र क्रमांक एसएसपी-0515/सीआर-78/2019/तीन, दि. 30/12/2019
2) इकडील नियुक्ती आदेश क्रं.मह/.कार्या./आस्था-5ड/216/2020 दिनांक 05.03.2020
3) इकडील पत्र क्रं.मह/.कार्या./आस्था-5ड/246/2020 दिनांक 19.03.2020
4) मा. उपसचिव, परिक्षापूर्व, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडील प्रसिध्दीपत्रक क्रं. सीटीटी-920/सी.आर.-46/2019/तीन दिनांक 22 मार्च 2020

मा. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे जिल्हा केंद्रावर मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडील पत्र क्रमांक एसएसपी-0515/सीआर-78/2019/तीन, दि. 30/12/2019 चे निर्देशानुसार राज्य सेवा(पूर्व) परीक्षा-2020, दिनांक 05.04.2020 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 व दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत घेण्यात येणार आहे. प्रस्तुत परिक्षेचे कामकाज करणे करीता आपले कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपकेंद्रप्रमुख/सहाय्यक/पर्यवेक्षक/समवेक्षक/लिपिक म्हणून इकडील आदेश क्रं.मह/.कार्या./आस्था-5ड/216/2020 दिनांक 05.03.2020 अन्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तथापि नोवेल कोरोना (COVID-19) विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्याकरीता सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या अनुषंगाने सार्वजनिक हितास्तव महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विषयांकित परीक्षेमध्ये फेरबदल करण्यात आलेला आहे. संदर्भ क्रं. 4 चे प्रसिध्दी पत्रकान्वये दिनांक 05.04.2020 रोजी घेण्यात येणारी राज्यसेवा पूर्व परिक्षा 2020 रविवार दिनांक 26 एप्रिल 2020 या सुधारीत दिनांकाला सकाळी 10.00 ते दुपारी 05.00 या कालावधीत घेण्यात येणार आहे.

तथापि नोवेल कोरोना (COVID-19) विषाणूच्या प्रादुर्भावाच्या स्थितीच्या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी राबविण्यात येणा-या उपाययोजना विचारात घेऊन, परीक्षेच्या आयोजनाच्या अनुषंगाने आयोगाकडून फेर आढावा घेण्यात येईल असे आयोगाने संदर्भ क्रं. 5 चे पत्रान्वये कळविले आहे तरी त्या अनुषंगाने मा. आयोगाकडून पुनःश्च परिक्षेच्या दिनांकामध्ये फेरबदल झाल्यास या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळी (www.ahmednagar.nic.in वर) प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत येईल. त्याकरीता या कार्यालयाचे संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे ही विनंती.

तरी संदर्भ क्रं 2 चे आदेशान्वये केलेली नेमणुक दिनांक 26.04.2020 रोजीचे राज्यसेवा पूर्व परिक्षेकरीता कायम करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुढील प्रशिक्षण वर्ग आयोजित करणेबाबत आवश्यक त्या सुचना या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळी (www.ahmednagar.nic.in वर) प्रसिध्द करणेची कार्यवाही करणेत येईल त्याकरीता या कार्यालयाचे संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे ही विनंती.

Scanned with CamScanner

प्रस्तुतचे पत्र सर्व नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून दिलेबाबत, आपले कार्यालयातील सर्व नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांची नाव, नियुक्तीचे पदनाम, दुरध्वनी क्रमांकासह दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदर पोहोच या कार्यालयाकडेस उलट टपाली सादर करावी अथवा या कार्यालयाचे ईमेल आय डी (tahsildarrevahmednagar@gmail.com) वर मेल करावी. मा.आयोगामार्फत आयोजीत करण्यात येणा-या परिक्षांचे स्वरुप अतिसंवेदनशील असलेने सदर परिक्षेकामी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करुन देणे व संबंधितांनी नियुक्तीचे परिक्षाकेंद्रावर उपस्थित राहाणे बंधनकारक आहे.

तरी आपलेकार्यालयातील नियुक्त कर्मचारी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहातीलच , उक्त नमुद सुचनांचे व मा. आयोगाचे प्रत्येक सुचनांचे काटेकोर पालन करतील याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी. प्रस्तुत परिक्षा सुरळीत पार पाडणेचे दृष्टीने सहकार्य करावे ही विनंती.

(उदय किसवे),
केंद्रप्रमुख,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर

Scanned with CamScanner